# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लोप्रवि पहिली खबर क्र. FIR No. 30 वर्ष Year 2025 दिनांक Date 23/9/25

2. (i) अधिनियम Act ............ कलमे Sections 7, 7 (अ)
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : Day गुरुवार शुक्रवार तारीख पासून Date from 18/9/25 वेळ Time 14.00 तारीख पर्यंत Date to 22/9/25 वेळ Time 21.20

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 18/09/2025 वेळ Time 14.00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 4 तारीख Date 23/09/25 वेळ Time 09.00 am वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ............ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ............ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ............

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name शुभम हॉटेल ठिकाणाचे नंबर No. if any स्वामी नारायण मंदिर समोर गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व) मु. 400014
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ......

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name कमरान अब्दुल सत्तार (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अब्दुल सत्तार

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ............ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9702189005

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............

(g) धर्म Religion मुस्लीम जात Caste ............ जनजात Sub-Caste ............

(h) पत्ता Address रुम क्र. 2, भास्करवाडी, म3 मालाड (पश्चिम) वजिला तलाव समोर मु. 61 गल्ली/सर्व्हे नं. Ward ...... घर/नाव नं. House Name No. ...... फोन/मो. नं. Phone No. ...... पॅन नं. Pan No. ...... वोटर्स नं. Card No. ......

रस्त्याचे नाव Road ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......

तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) अरुणकुमार समरबहादूर सिंग, वय-58 वर्ष, रा.ठी - रुम नं. 206, शिवकुंज लोकमान्य नगर, बस डेपो समोर ठाणे (प). (वकील)
(2) रोहीत रमेश सावंत पोलीस निरीक्षक लोहमार्ग गुन्हे शाखा दादर (प)

फिर्याद                    दिनांक २३/०९/२०२५

मी, कमरान अब्दुल सत्तार, वय– ३३ वर्षे, व्यवसाय : नाटय कलाकार, राठी : रूम नं. ०२, कासकरवाडी, वनेला तलावाच्यासमोर, मड, मालाड(प), ४०००६१. मो.क्र.९७०२१८९००५, आधार कार्ड क्र ९३२२०८७३१११८.

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या जन्मापासून राहावयास आहे. माझी लहान बहीण श्रीमती सिम्मी खान हीचे पती नामे जैनुल खान उर्फ सोनु, रा.ठि. १०२, राबिया मंझिल, वर्सोवा व्हिलेज, जामा मस्जिदच्या जवळ, अंधेरी (प), मुंबई– ४०० ०६१ येथे राहण्यास आहे. माझे जिजा श्री. जैनुल खान उर्फ सोनु यांनी माझे घरी येवुन मला सांगितले की, बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणे, मुंबई (बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे) येथे गुन्हा रजि.नं. ३५३/२०२५, कलम ६१, २०४, ३०१६, ३(५) भारतीय न्यास संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल असुन नमुद गुन्हयाचा तपास पोलीस इन्स्पेक्टर रोहित रमेश सांवत, गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर, मुंबई हे करीत आहेत. सदर गुन्हयामध्ये माझे जिजा श्री. जैनुल खान उर्फ सोनु यांस आरोपी न करण्यासाठी पोलीस इन्स्पेक्टर रोहित रमेश सांवत यांनी वकील अरूण सिंग यांचे मार्फतीने रूपये १०,००,०००/– (रू.दहा लाखाची) मागणी केली असल्याचे माझे जिजा श्री. जैनुल खान उर्फ सोनु यांनी मला सांगितले.

त्यानंतर मी घाबरून माझे मित्र व रिश्तेदार यांचेकडुन पैसे उधार घेवुन रू.५,००,०००/– जमविले. सदर जमा केलेले पैसे रूपये पाच लाख घेवुन मी दिनांक १३/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५:४५ चे सुमारास दादर रेल्वे स्टेशन पुर्व येथे पोलीस इन्स्पेक्टर रोहित सांवत यांनी सांगितल्याप्रमाणे शुभम हॉटेलच्या बाहेर वकील अरूण सिंग यांना भेटलो. त्यावेळी वकील अरूण सिंग यांनी मला पैसे लाये क्या, असे विचारले असता, मी 'हा' असे बोलुन रू.५,००,०००/– त्यांचेजवळ दिले. त्यावेळी वकील अरूण सिंग यांनी मला सांगितले की, सदर पैसे आपण सांवत साहेबांना त्यांचे ऑफिस मध्ये जावुन देवू. त्यावेळी मी व वकील अरूण सिंग असे दोघेजण गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर, मुंबई येथील सांवत साहेबाच्या ऑफिस मध्ये गेलो. तेथे सांवत साहेबाची भेट घेतली. त्यावेळेस सांवत साहेबांनी मला विचारले की, तुझ्या जिजाला गुन्हयात आरोपी न करने लिए वकील साहब को १० लाख रूपये दिले का, त्यावर मी त्यांना सांगितले की मी पाच लाख रूपये वकील अरूण सिंग यांना दिले आहे. तेव्हा सांवत साहेबांनी माझेकडे उर्वरित पाच लाख रूपये लवकरात लवकर वकील अरूण सिंग यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मला जाण्यास सांगितले.

त्यानंतर वकील अरूण सिंग व पोलीस इन्स्पेक्टर रोहित सांवत हे मला वांरवार व्हॉट्सअॅप कॉल करून उर्वरित पाच लाख रूपयांबाबत मागणी करीत आहे. नमुद गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर (पुर्व) मुंबई येथील लोकसेवक पोलीस इन्स्पेक्टर रोहित रमेश सांवत व वकील अरूण सिंग यांनी माझे जिजा श्री. जैनुल खान उर्फ सोनु यांना वर नमुद गुन्हयात आरोपी न करण्याकरीता माझेकडे रु.१०,००,०००/– लाचेची मागणी केली. माझेकडे काहीही पर्याय नसल्याने माझी इच्छा नसताना सुध्दा मी पहिला हप्ता म्हणून नमुद लोकसेवकास रु. ५,००,०००/– इतकी रक्कम दिली व उर्वरित रु. ५,००,०००/– लाचेची रक्कम लोकसेवकास देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १८/०९/२०२५ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात आलो. तेथे पो नि.संदीप पाटील, पो.नि.संतोष गुर्जर यांना भेटून त्यांना वरिलप्रमाणे हकीकत सांगितली. पो.नि. संदीप पाटील यांनी मला माझे स्वहस्ताक्षरात तक्रार अर्ज देण्यास सांगितले असता, मी माझे स्वहस्ताक्षरात हिंदी भाषेमध्ये तक्रारअर्ज त्यावर सही केली. तो अर्ज पो.नि.संदीप पाटील यांनी त्यांच्याकडे ठेवून घेतला व माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगितले.

पो.नि.संदीप पाटील यांनी मला दिनांक १९/०९/२०२५ रोजी दुपारी लाप्रवि कार्यालयात बोलाविल्याने मी दि. १९/०९/२०२५ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. पो.नि. संदीप पाटील यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून त्यांचेशी माझी ओळख करून दिली. तसेच सदर ठिकाणी हजर असलेले पो नि. संतोष गुर्जर व ए.सी.पी. उमा गवळी यांची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी माझे

तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगून, मी केलेला तक्रार अर्ज दोन्ही पंचांना वाचण्यास दिला. सदरची तक्रार बरोबर असल्याची खात्री झाल्यावर पंचांनी व तपासी अधिकारी पो.नि. पाटील व पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. गुर्जर यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या.

त्यानंतर पो.नि. पाटील यांनी पंचास सांगितले की, श्री. कमरान अब्दुल सत्तार हे आज रोजी लोकसेवक पो.नि. रोहित सांवत व वकील अरूण सिंग यांना भेटणार असून त्यांच्या कामासंदर्भाने चर्चा करणार आहेत. सदर वेळी वकील अरूण सिंग व लोकसेवक पो.नि. रोहित सांवत हे लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यात येणार असून सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात येईल.

त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला पडताळणी कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. संदीप पाटील, पो.नि. संतोष गुर्जर, ए.सी.पी. श्रीमती गवळी व दोन सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेलो. तेथे माझे, पो.नि. पाटील, माझे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, पंच, पो.नि. पाटील, पो.नि. गुर्जर, ए.सी.पी. श्रीमती गवळी व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयाच्या बाहेर येवून सरकारी वाहनाने दादर शिवाजीपार्क येथे थांबलो. तेथे गेल्यानंतर पो.नि. पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व माझे सोबत पंच क्र. १ राजेश जाधव असे माझे मोटार बाईक क्र. MH 02GF 5303 वरून लोकसेवकाच्या कार्यालयाजवळ रवाना झालो. त्यादरम्यान वकील अरूण सिंग यांचे मोबाईल क्र. ९३२२७३७०९९ वरून माझे मोबाईल क्र. ९७०२१८९००५ वर व्हॉट्सअॅप वर सायंकाळी ०६:४० व ०६:४९ वाजता मिस कॉल आला होता. मी बाईकवर असल्यामुळे मी त्यांना सायंकाळी ०७:१५ चे दरम्यान व्हॉट्सअॅप कॉल केला असता, वकील अरूण सिंग यांनी मला लवकर गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर येथे लोकसेवक पो.नि. सांवत यांचे ऑफिस जवळ येण्यास सांगितले. त्यावेळी वकील अरूण सिंग यांनी, सांवत साहेब ०७:३० ची बोरिवली एसी लोकल पकडून लवकर घरी जाणार आहेत. असे सांगितले त्यावर मी त्यांना प्लॅटफॉर्म नं. १ जवळ पोहचलो आहे असे कळविले. त्यानंतर मी लोकसेवक पो.नि. सावंत यांचे ऑफिस जवळ पोहचलो असता, सदर ठिकाणी माझी वकील अरूण सिंग यांची भेट झाली, त्यावेळी वकील अरूण सिंग यांनी मला सांगितले की, आप दो मिनट लेट हो गये, साहब खडे थे यहा पे, तो ०७:३० ची बोरिवली एसी लोकल है ना, फॅमिली फक्शन है ना। तो निकल गये। त्यावेळी मी व वकील अरूण सिंग यांचेशी चर्चा केली. वकील अरूण सिंग यांनी मला शनिवारी परत येण्यास सांगितल्याने, मी तेथुन निघुन शासकीय वाहन थांबविलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे माझेकडील व्हाईस रेकॉर्डर पो.नि. पाटील यांनी काढला व बंद केला. त्यानंतर आम्ही कार्यालयात परत आलो. माझे व वकील अरूण सिंग यांच्यासोबत झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनी मुद्रीत झालेले आहे. पो.नि. पाटील यांनी संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट बनवुन सविस्तर पंचनामा केला.

दिनांक २०/०९/२०२५ रोजी मी पुन्हा लाप्रवि कार्यालयात १५:०० वाजता हजर झालो. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी मला पडताळणी कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. पाटील, पो.नि. गुर्जर व दोन सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेलो. तेथे पो.नि. पाटील, माझे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

समक्ष

(संदीप पाटील),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

दिनांक १९/०९/२०२५ रोजीच्या पडताळणीमध्ये तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाली नसल्याने पो.नि. पाटील यांनी मला प्रथम वकील अरूण सिंग यांना कॉल करून लोकसेवक यांचेसोबत करावयाच्या भेटीची वेळ, ठिकाण निश्चीत करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईल क्र.९७०२१८९००५ वरून लोकसेवक जाधव यांचे मोबाईल क्र. ९३२२७३७०९९ वर १७:१८ वा.चे दरम्यान व्हॉटस्अॅप कॉल करून संपर्क केला असता, वकील अरूण सिंग यांनी कॉल स्विकारला नाही. त्यानंतर १७:२५ वा. वकील श्री अरूण सिंग यांनी समोरून मला व्हॉटसअॅप कॉल केला व मला सहा वाजता भेटण्याकरीता बोलाविले, त्यावर मी 'पैसे का जुगाड हुआ नही है पुरा' असे म्हणालो, त्यावर वकील अरूण सिंग यांनी मला 'क्या बोलू मै...मै क्या कर सकता हू' असे बोलले. त्यावर मी त्यांना ' मै आता हू आपसे मिलता हू.... फिर साहब के पास चलते है' असे म्हटल्यावर, वकील अरूण सिंग यांनी आप आईये असे मला येण्यास सांगितले.

त्यानंतर मी, पंच, पो.नि.पाटील, पो.नि.गुर्जर व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयाच्या बाहेर येवून सरकारी वाहनाने दादर शिवाजीपार्क चैत्यभुमीजवळ थांबलो. तेथे गेल्यानंतर पो.नि. पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व माझे सोबत पंच क्र. १ राजेश जाधव असे माझे मोटार बाईक क्र. MH 02GF 5303 वरून लोकसेवकाच्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. त्यादरम्यान साधारण ०६:२१ वा.चे सुमारास यातील वकील अरूण सिंग यांचा मोबाईल क्र. ९३२२७३७०९९ वरून माझे मोबाईल क्र.९७०२१८९००५ वर व्हॉटस्अॅप कॉल आला असता, त्यांनी मला सांगितले की, ते लोकसेवकाचे ऑफीसमध्ये बसले असुन साडे सहा पर्यंत येण्यास सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक पो.नि. सांवत यांचे गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर, मुंबई येथील ऑफीसमध्ये गेलो असता, माझी लोकसेवक पो.नि. सांवत व वकील अरूण सिंग यांचेशी भेट झाली. त्यावेळी पो.नि. सांवत यांनी मला मोबाईल बाहेर ठेवुन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी मोबाईल बाहेर ठेवुन आलो. त्यानंतर मी लोकसेवक पो.नि. सांवत व वकील अरूण सिंग यांना सांगितले की, तीन लाख चालीस हजार रेडी है, जो मेरे अकाऊंट मै है, एक लाख दस हजार कम है, बताइये क्या करू, सर से अभी क्लिअर कहा हुआ है, सर ने ...सावंत साहब ने बोला कहा, सर रहेम करो सर असे विचारले असता, लोकसेवक सांवत यांनी मला 'मत दो.... मैन कहा जबरदस्ती किया असे म्हटले....त्यावर मी त्यांना 'लेकीन देखिये मैंने पाच दिया ना, असे बोलल्यावर वकील अरूण सिंग यांनी मला 'दिया ना पाच आपने' असे सांगितले. त्यावर वकील अरूण सिंग यांनी मला ' यही पे बात हुई थी ना...हम यहा तीन लोग थे.......दुसरा कौन था अशी विचारणा केली. त्यावर लोकसेवक सांवत यांनी 'सुनिये मेरी बात...उसके पहिले ही बात हुआ था....साफ शब्दों मैने बोला था की वो सब उसका है' त्यानंतर लोकसेवक सांवत यांनी मला व वकील अरूण सिंग यांना बाहेर जावुन चर्चा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व वकील अरूण सिंग हे लोकसेवक सांवत यांचे ऑफिसमधुन बाहेर येवुन चर्चा केली. त्यावेळी मी वकील अरूण सिंग यांना म्हणालो की, 'तो यही बताईये जब सांवत साहब को मैने दे चुके हू पाच लाख रूपये.....ठिक है'. त्यावर वकील अरूण सिंग यांनी मला 'हा' असे उत्तर दिले. त्यावर वकील अरूण सिंग हे मला म्हणाले, सोनु का नाम नही डाला, तो नही डाला......इतनी बडी केस से निकाल दिया....साडे चार दे ही रहे होना......साडे नौ लाख दे रहे हो.......पच्चास हजार के लिए क्या किचकिच करने का? असे बोलुन वकील अरूण सिंग यांनी माझे जिजा श्री. जैनुल खान उर्फ सोनु यांस वर नमुद गुन्हयात आरोपी न करण्याच्या लोकसेवक सांवत यांचेवतीने यापुर्वी रू.५,००,०००/– स्विकारल्याचे कबुल करून, उवरित रूपये ५,००,०००/– मागणी करून तडजोडीअंती रू.४,५०,०००/– इतक्या रक्कमेची मागणी केली. नमुद रक्कम येत्या सोमवारी 'मंडे छे बजे' घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी शासकीय वाहन थांबविलेल्या ठिकाणी परत गेलो. तेथे माझेकडील व्हाईस रेकॉर्डर पो.नि.पाटील यांनी काढला व बंद केला. लोकसेवक सांवत व वकील अरूण सिंग यांच्यासोबत झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये

ध्वनी मुद्रीत झालेले आहे. त्यानंतर आम्ही कार्यालयात परत आलो. पो.नि. पाटील यांनी संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट बनवुन सविस्तर पंचनामा केला.

दिनांक २२/०९/२०२५ रोजी मी पुन्हा लाप्रवि कार्यालयात ११:०० वाजता हजर झालो. तेथे पो. नि.पाटील यांनी मला पुन्हा एकदा सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. पाटील व पो.नि. गुर्जर यांनी मला तसेच पंच क्र १ व २, तसेच सापळा पथकातील सर्व लोकांना सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. गुर्जर, पो.नि.पाटील व दोन सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेले. तेथे माझे, पो.नि. पाटील व दोन पंचांचे साधारण १९:२४ वा.चे सुमारास वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. पो.नि. पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल क्र.९७०२१८९००५ वरून वकील अरूण सिंग यांचा मो.क्र. ९३२२७३७०९९ वर संपर्क केला असता, वकील अरूण सिंग यांनी 'आ जाव म वेट कर रहा हू' असे बोलले...त्यावर मी त्यांना 'ठिक है ठिक है... आ रहा हू' असे बोलुन फोन कट केला.

त्यानंतर पथकातील अंमलदाराकडून माझी अंगझडती घेण्यात आली. अंगझडती घेत असताना पो.नि. पाटील यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी माझे जवळ असलेल्या बचतीतील रोख रक्कम रू.४,५०,०००/–( चार लाख पन्नास हजार रूपये ) पो.नि. पाटील यांच्याकडे दिली. त्यावेळेस त्यांनी कार्यालयीन प्रिंटरव्दारे सदर नोटांच्या झेरॉक्स काढल्या. पो.नि. गुर्जर यांच्या आदेशान्वये पथकातील वाहन चालक पो.ह.क्र.०७०१९०/अजय पवार यांनी त्यांचेकडील अॅन्थ्रासिन पावडर दाखवून पो.नि. पाटील यांनी मला, दोन पंच व इतर सापळा पथकातील कर्मचारी यांना अॅन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली. त्यानंतर वाहन चालक पो.अं. पवार यांनी मी दिलेल्या ४,५०,०००/– रकमेतील नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा एका खाकी रंगाच्या मोठया लिफाफ्यात ठेवुन, सदर लिफाफ्यास देखील अॅन्थ्रासिन पावडर लावली. सदर लिफाफा माझ्याकडील सफेद व काळया रंगाच्या प्लास्टीकच्या पिशवीत ठेवला. त्यानंतर मी, दोन्ही पंच, पो.नि. पाटील, पो.नि. गुर्जर, ए.सी.पी. श्रीमती गवळी व पोलीस पथक असे लाप्रवि कार्यालयाच्या बाहेर येवून दोन सरकारी वाहनाने दादर येथील विशेष सुरक्षा पथक, दादर, मुंबई कार्यालयाच्या थोडया अंतरावर असलेल्या रस्त्यालगत पोलीस वाहन असल्याचा कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबलो. तेथे पो.नि. पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आतील बाजूस बनियनला लावला. त्यानंतर मी, व माझे सोबत पंच क्र. १ राजेश जाधव असे माझे मोटार बाईक क्र. MH 02GF 5303 वरून दादर रेल्वे स्टेशन पुर्व हॉटेल शुभम च्या दिशेने निघालो. आमच्या मागे थोडया थोडया अंतरावर पंच क्र. २, पो.नि. पाटील, पो.नि. गुर्जर व सापळा पथक असे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे आमच्या मागे येत होते. मी दादर रेल्वे स्टेशन पुर्व समोरील शुभम हॉटेलच्या पहील्या मजल्या वरील ए.सी. रूम मध्ये गेलो असता, पो.नि. पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल क्र.९७०२१८९००५ वरून वकील अरूण सिंग यांचा मो.क्र. ९३२२७३७०९९ वर संपर्क केला असता, वकील अरूण सिंग यांनी अरे चाय के दुकान पे है....प्लॅटफॉर्मपर....त्यावर मी त्यांना 'आ जाइये....उपर बैठे है.... शुभम मै' असे बोलुन त्यांना येण्यास सांगितले.

समक्ष,

(संदीप पाटील),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

मी शुभम हॉटेलमध्ये प्रवेश केल्यानंतर पो.नि. गुर्जर, पो.नि. पाटील, ए.सी.पी.श्रीमती गवळी व सापळा पथक एक एक करून कोणालाही संशय येणार नाही असे हॉटेल मध्ये प्रवेश केला पोलीस पथकाने कोणालाही संशय येणार नाही अशा प्रकारे विखरून वेगवेगळे टेबलवर बसुन सापळा लावला.

काही वेळातच वकील अरूण सिंग व त्याचा साथीदार असे दादर रेल्वे स्टेशन पुर्व समोरील शुभम हॉटेलच्या पहील्या मजल्यावर येवुन मला भेटले असता, वकील अरूण सिंग यांचेबरोबर गुन्हयाच्या संदर्भाने चर्चा केली. त्यानं तर काही वेळाने वकील अरूण सिंग यांनी मागणी केल्यानुसार मी ' ये आपकी अमानत आप......मै भी गिना नही हू....चार पचासो.... हा...हा...हा, अरे देख लिजीएगा, आप बात कर लिजीये' असे वकील अरूण सिंग यांना बोललो व मी माझे सोबत असलेली सफेद आणि काळया रंगाच्या प्लॅस्टिक पिशवीत असलेली अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ४,५०,०००/— वकील अरूण सिंग यांच्या समोर धरली असता, वकील अरूण सिंग यांनी दोन्ही हाताने सफेद आणि काळया रंगाच्या प्लॅस्टीक पिशवीत असलेली अँथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ४,५०,०००/— ही स्विकारली व सोबत असलेल्या सॅगबॅगमध्ये ठेवली. त्यानंतर वकील अरूण सिंग हे 'पुरे है की कम है? मैं अभी गिनता नही हू, कितना है? पुरा है? अेटी फाईव्ह....पंधरा कम है... और डालनाप डेगा ना....' असे मला बोलले. त्यानंतर मी डोक्यावरून हात फिरवुन वकील अरूण सिंग यांनी लाच स्विकारल्याबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने वकील अरूण सिंग यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर, मुंबई येथील लोकसेवक पोलीस निरीक्षक. रोहित रमेश सांवत यांनी माझे जिजा जैनुल खान उर्फ सोनु बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणे, मुंबई (बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे) येथे गुन्हा रजि.नं. ३५३/२०२५, कलम ६१, २०४, ३०१६, ३(५) भारतीय न्यास संहिता २०२३ या गुन्हयात आरोपी न करण्याकरीता वकील अरूण सिंग यांचे मार्फतीने रू. १०,००,०००/— लाचेची मागणी केली. माझी इच्छा नसतानाही मी त्यांना लाचेच्या मागणीचा पहिला हप्ता रू. ५,००,०००/— दिला परंतु आणखी लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने, मी लाप्रवि येथे दिलेल्या तक्रारीवरून पडताळणी व सापळा कारवाई करण्यात आल्या व आज रोजी पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान वकील अरूण सिंग यांनी रू. ४,५०,०००/— इतकी लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले, त्यानंतर वकील अरूण सिंग यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत लोकसेवक पो.नि. सांवत यांना कॉल करून सांगितले असता, त्यांनी संमती दर्शविली म्हणून माझी त्या दोघाविरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक श्री. रोहित रमेश सांवत, गुन्हे शाखा, लोहमार्ग, दादर, मुंबई व वकील श्री. अरूण सिंग यांचे बरोबर कोणतेही पुर्ववैमनस्य नाही.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून, ती मला हिंन्दीतून वाचून मराठीतून समजवून सांगितली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(संदीप पाटील),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Kamran

रदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..... चार लाख पन्नास हजार रु. फक्त

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

हकिकत अशा प्रकारे आहे की बांद्रा पोलीस ठाणे लोहमार्ग येथील गुन्हा रजिस्टर नं. 353/2025 मध्ये तक्रारदार कामरान सत्तार यांचे मेहुणे सोनु उर्फ मलुल खान यास सदर गुन्ह्यामध्ये अटक न करण्यासाठी तपासी अधिकारी शेटीत सावंत यांचे मध्यस्थी वकिल अरुण सिंग याने तक्रारदार यांच्याकडुन पाच लाख रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती चार लाख पन्नास हजार रुपये स्विकारले म्हणुन गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो नि. संदीप पाटिल

**2.** तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............ जिल्हा ............ राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ........... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............

(3) Transferred to P. S. ............
District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... संदीप पाटील

पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ............

Posting

Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report